पौष कृ. ५, शके १९४१
**मकर संक्रांत**
बुधवार, १५ जानेवारी २०२०

# विवेकानंद वार्ता



## संपादकीय

नमस्कार,

येणाऱ्या मकरसंक्रांत पर्वणीच्या हार्दिक शुभेच्छा ! संक्रमण हा तर निसर्गाचा नियम ! आणि बदलत्या काळासमवेत परिवर्तनाचा स्वीकार, हे मानवी स्वभावाचे वैशिष्ट्य ! आपण सर्वजण हे नित्य अनुभवत आहोत. कालपर्यंत प्रथा आणि आवश्यकता असणाऱ्या बाबी, आज अलगदपणे आणि सहजपणे नवीन रुपात आपण स्वीकारतोच ! या स्वीकारातच प्रगतीची बीजे आहेत. अर्थात, जुन्यातील सकसता आणि नव्यातील तंत्रता यांची सांगड महत्त्वाचीच ! विवेकानंद रुग्णालय आणि संशोधन क्षेत्राची वाढती क्षितीजेही या तत्वांनाच अनुसरून वाटचाल करीत आहेत.

वैद्यकीय क्षेत्रात कालानुरूप समोर येणाऱ्या आव्हानांनुसार, रुग्णालय आपल्या प्रकल्पांमध्ये वृध्दि करीत आहे. नवजात शिशू सुरक्षा कार्यशाळा व लातूर - सोलापूर - परभणी जिल्ह्यातील प्राथमिक उपचार केंद्राच्या कर्मचाऱ्यांसाठी कर्करोग निदान व समुपदेशनाचे मार्गदर्शन करणारे निवासी शिबिर आयोजीत केले होते, त्याची संपूर्ण माहिती या वार्तेत देत आहोत. दिवंगत श्री. सुरेशजी केतकर काका त्यांच्या जीवनाच्या सायंकाळी, विवेकानंद रुग्णालयात होते - हे रुग्णालयाचे भाग्यच ! त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित केलेला गुणवंत कर्मचारी पुरस्कार सोहळ्याचे वृत्त, रुग्णांच्या नातेवाईकांची उपचार व सर्वंकष तपासणी विषयीची आलेली कृतज्ञता पत्रे यांचाही समावेश आहे.

विवेकानंद रुग्णालयाच्या घडणीमध्ये जे महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहेत - त्यातील एक व्यक्तीमत्व म्हणजे डॉ. महेशजी देवधर ! त्यांच्या एकाहत्तरीत पदार्पणानिमित्त त्यांचे अभिष्टचिंतन ! कर्तव्यतत्पर देवधर काका, नेत्रतज्ञ आहेत. त्यांच्या अनुभवाचा व कौशल्याचा लाभ हजारो रुग्णांनी आत्तापर्यंत घेतला आहे. डॉ. महेशजींविषयी लेख या अंकात समाविष्ट आहे.

अंदमान निकोबारच्या सहलीचे एका वेगळ्या संवेदनशीलतेतून उतरलेले मनोगतही आपणास भाराऊन टाकणारे आहे.

सर्वदूर छान थंडीचे वातावरण आहे! उत्तम आरोग्यासाठी सर्वांना शुभेच्छा!

पूढील वार्तेत भेटूया.

**- सौ. कुमुदिनी भार्गव**

## VIA Training Programme



कर्करोग हा आजार असामान्य वाढणाऱ्या शरीरातील पेशींचा समूह होय. कोणतीही तपासणी न केल्यामुळे हा आजार वाढत राहतो व त्यामुळे अकाली मृत्यू ओढवतो.

हा आजार शरीराच्या कोणत्याही भागात, वयोगटात, सामाजिक व आर्थिक स्तरातील लोकांत आढळतो. जगातील एकूण लोकसंख्येपैकी १४१ लक्ष नवीन रुग्ण प्रतिवर्षी कर्करोगग्रस्त होतात. सापेक्षतः भारतामध्ये ही संख्या कमी आहे आणि याचे कारण म्हणजे भारतीयांची परंपरागत आहार-विहार व ऋतूचर्या होय.

परंतू कर्करोगामुळे होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण मात्र भारतामध्ये इतर देशांपेक्षा जास्त आहे. आणि या एकूण मृत्यूमूखी पडणाऱ्यांपैकी पुरूषांपेक्षाही स्त्रियांचे प्रमाण अतिशय जास्त आहे. भारतीय स्त्रियांमध्ये स्तन व गर्भाशय ग्रीवेचे कर्करोग यांचे प्रमाण अधिक आढळते. आपल्या देशात दरवर्षी जवळपास १,३०,००० गर्भाशय ग्रीव्हेच्या कर्करोगाचे नवीन रुग्ण आढळतात आणि दरवर्षी ८०,००० स्त्रिया या आजाराने मृत्यू पावतात. आपल्या भारतात ७० ते ९५ टक्के कर्करोगाचे निदान प्रगत अवस्थेत होत असल्यामुळे जीवित्वाचे प्रमाण कमी आहे.

यामागे आजारांसंबंधी अज्ञान, गैरसमज व भिती हे कारण तर आहेच, परंतू वेळेत निदान व उपचार यासंबंधीच्या खर्चाचे कुटुंबावर अवलंबित्व हे देखील प्रमुख कारण आहे.

या सर्व घटकांचा विचार करुन विवेकानंद कॅन्सर हॉस्पिटल व राज्य शासनाचा असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम यांच्या संयुक्त विद्यमाने VIA Training Programme हा राबविण्यात आला.



यामध्ये लातूर, सोलापूर व परभणी या तीन जिल्ह्यांमधील प्राथमिक उपचार केंद्रावर कार्यरत असणाऱ्या एकूण ६६ GNM, LHV यांना Visual Inspection with Acetic Acid या गर्भाशय ग्रीवेच्या कर्करोगाची तपासणी संदर्भात प्रशिक्षण देण्यात आले.

ही तपासणी अतिशय कमी वेळात व कमी खर्चात निदान करणारी असल्याने भारतातील खेड्यापाड्यांमधील स्त्रियांसाठी ती अतिशय उपयुक्त आहे.

या प्रशिक्षणवर्गात गर्भाशय ग्रीवेच्या कर्करोगासोबतच स्तनाच्या कर्करोगाचे निदान, तंबाखूसेवानाचे दुष्परीणाम व मुखाचा कर्करोग, व्यसनमुक्ती, कर्करोग आजार-निदान व उपचार यासंबंधीचे समूपदेशन कसे करावे याबद्दलचे मार्गदर्शन देखिल करण्यात आले. दहा दिवसांच्या निवासी शिबिरात विवेकानंद रुग्णालयातील कर्करोग तज्ञ डॉ. ब्रिजमोहन झंवर, डॉ. प्रमोद टिके, डॉ. लीलता नेल्लेरे, डॉ. धिरज सिन्हा, स्त्रीरोग तज्ञ डॉ. साधना कनामे, डॉ. अमृता पाटील, विकृती विज्ञान विभागातील डॉ. राम कुलकर्णी, डॉ. शितल ठाकूर (टिके) या सर्वांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजयजी ढगे, डॉ. माले सर, डॉ. कापसे सर यांनी देखिल सहभागी होऊन प्रशिक्षणार्थींचा उत्साह वाढविला.

**- डॉ.सौ. गौरी मंगेश कुलकर्णी**

## पहिले सोनेरी मिनीट

आपले कार्य करत असताना आलेला संथपणा व शैथिल्य घालवण्यासाठी, व नव्याने काही शिकण्यासाठी विवेकानंद रुग्णालय, लातूर इंडियन ॲकॅडमी ऑफ पिडियाट्रिक्स यांच्या संयुक्त विद्यमाने 'नवजात शिशु सुरक्षा' ही कार्यशाळा विवेकानंद रुग्णालयात दि. १४.०७.२०१९



रोजी आयोजित करण्यात आली होती. याचे उद्‌घाटन इंडियन ॲकॅडमी ऑफ पिडियाट्रिक्स चे लातूर जिल्ह्याचे अध्यक्ष श्री. मुंदडा सर यांनी केले.

आपल्या आयुष्यातील प्रत्येक पहिल्या गोष्टीचे वेगळेच महत्त्व असते. विशेषतः पहिले बाळंतपण आणि बाळाचे पहिले रडणे, किंवा त्याचा पहिला श्वास !

तो आवाज ऐकल्याबरोबर बाळाची आई, बाहेर वाट बघणारे नातेवाईक आणि डॉक्टर्स सर्वच जण आनंदी आणि निश्‍चिंत होतात. पण जर हे बाळ रडलेच नाही तर ? नुसत्या विचारानेच अंगावर काटा उभा राहतो. म्हणूनच त्याच्या रडण्यासाठी किंबहूना या जगात आल्यानंतरच्या 'पहिल्या श्वासासाठी' ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

९० टक्के नवजात बालके ही नैसर्गिकरित्या श्वास घेतात व रडतात त्यांना प्रयत्नांची गरज भासत नाही. पण १० टक्के नवजात बालकांना मदतीची गरज भासते, आणि ती न मिळाल्यास त्यांच्यामध्ये मतिमंदत्व येण्याची शक्यता असते. या कार्यशाळेत प्रसुति विभागातील बाळाची जन्मावेळेची तयारी व ते बाळ न रडल्यास करावयाची उपाययोजना, तसेच कृत्रिम श्वासोश्वास (Bag and Mask Ventilation) या गोष्टीचे प्रशिक्षण देण्यात आले. चर्चासत्रात झालेल्या प्रश्नोत्तरांमधून बऱ्याच नवीन गोष्टींचे ज्ञान अवगत झाले. या कार्यशाळेत डॉ. दिपीका भोसले, डॉ. सचिन जेथलिया, डॉ. विश्वास सोळुंके आणि डॉ. शितल भट्टड यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी विवेकानंद रुग्णालयाच्या अध्यक्षा डॉ.सौ. अरुणा देवधर,



कार्यवाह श्री. अनिल अंधोरीकर, सहकार्यवाह डॉ. राधेशाम कुलकर्णी व डॉ. श्री. दिलीप देशपांडे उपस्थित होते.

विवेकानंद रुग्णालयातील स्त्रीरोग तज्ञ व वैद्यकीय अधिकारी व स्त्रीरोग व प्रसुती विभागातील व शस्त्रक्रिया विभागातील परिचारिका अशा ४० जणांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला. या प्रशिक्षणामुळे असा आत्मविश्वास निर्माण झाला की, खरोखरच आपण नवजात बालक मृत्यूचे प्रमाण कमी करु शकतो तसेच बालकांमधील मतिमंदत्व थांबवून त्यांच्या आयुष्यात सोनेरी क्षण आणू शकतो.

**- डॉ.सौ. अमृता पाटील**
स्त्रीरोग तज्ञ
विवेकानंद रुग्णालय, लातूर

## चार शब्द 'कौतुकाचे'

मी, धनराज आबाराव चोबे,

नमस्कार,

माझी पत्नी सौ. केवळबाई चोबे हिचे ऑपरेशन आपल्या हॉस्पिटलमध्ये दि. १७.०९.२०१९ रोजी गजाननाच्या कृपाशिर्वादाने व डॉक्टर साहेब / डॉक्टर ताई व कर्मचारी यांच्या प्रयत्नाने सुखरूप झाले.

आपल्या दवाखान्याची आगळी - वेगळी ओळख म्हणजे सर्वंकश तपासणी, ही आपल्या हॉस्पिटलमध्ये फक्त तीन हजार रुपयामध्ये होते. परंतु ह्या तपासणीसाठी दुसऱ्या हॉस्पिटलमध्ये किमान रु. पंधरा हजार लागतील. एवढेच नाही तर खेड्यातील / शहरातील रुग्ण असो किंवा तरुण / वृध्द रुग्ण असो यांना कसल्याही प्रकारचा त्रास नाही म्हणजे आपल्या डॉक्टर साहेब / डॉक्टर ताई यांचेकडून फाईल घेऊन आपल्या कर्मचारी ताई पेशंटला सोबत घेऊन प्रत्येक ठिकाणी नेतात त्यामुळे पेशंटला कसल्याही प्रकारचा त्रास नाह. उदा. इतर सिव्हिल हॉस्पिटल असो अथवा कुठलेही हॉस्पिटल असो तिथे सांगितले जाते की, १६ नंबर ला जा, २१ नंबर ला जा ते पेशंटला विचारत जावे लागते. ती पध्दत आपल्या हॉस्पिटलमध्ये नाही, त्यामुळे पेशंटला कसलाच त्रास नाही.

एवढेच नाही तर स्वामी विवेकानंदाच्या जीवनाच्या ताजेपणाची आठवण आपल्या संस्थेने जोपासली आहे. तसेच स्वच्छतेच्या बाबतीत सांगायचे झाले तर जणू काही संत गाडगेबाबांचा मार्ग अवलंबला आहे असे दिसून आले. सर्व डॉक्टर, सिस्टर, कर्मचारी, ताई / बांधव यांचे सर्वांचे प्रेमाचे बोलणे हे ही एक जमेची बाजू आहे.

आपल्या संस्थेचे अध्यक्ष डॉ. काकु-काका, डॉक्टर



साहेब, डॉक्टर ताई, सिस्टर, कर्मचारी ताई / बांधव यांचे आभार मानतो व आपल्या हॉस्पिटलची सेवा सर्व गरजूंना मिळो अशी ईश्वर चरणी प्रार्थना करतो व माझे हे अभिप्रायाचे दोन शब्द थांबवतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र !... धन्यवाद !

**- श्री. धनराज आबाराव चोबे,**
मु.पो. चिखली, ता.जि. उस्मानाबाद
मोबा. ९९२१२९९१८२

*(**Case History :** 60 yr/Menopausal Woman admitted for chro. Abd. Pain)*
***Diagnosis :*** *Post Hystrectomy Large Overian Cyst,* ***Plan :*** *Surgery (Risk involved of Adhesions between Blader & Bowel)*
***Surgery :*** *Laprotomy SA (for Exicision of Cyst)*
***Stay uneventful :*** *recovered well and discharged.* ***HPR :*** *High Grade Solid Serous Adeno Carcinoma of Rt Overian Capsule.*
***Advice :*** *Chemotherapy Cycles.*

## गौरव- सेवाभावाचा...

दि. १६.०७.२०१९ रोजी स्व. सुरेशराव केतकरांचा तृतीय स्मृतीदिन...

प्रतिवर्षाप्रमाणे त्यांच्या स्मतीदिनी स्व. सुरेशराव केतकर गुणवंत कर्मचारी पुरस्कार वितरणाचा सोहळा विवेकानंद रुग्णालयात संपन्न झाला.

स्व. केतकर काकांचे नावाने रुग्णालयातील गुणवंत कर्मचाऱ्यांना पुरस्कृत करण्याचे कारण, त्यांनी आपल्या रुग्णालयातील ४ वर्षाच्या वास्तव्याच्या काळात, येथील प्रत्येकावर कर्तव्यनिष्ठा व कार्यमग्नता या संदर्भात केलेल्या संस्कारांचे संक्रमण हेच आहे.

स्व. केतकर काका हे एक अविचल, दिशादर्शक दिपस्तंभ होते! त्यांच्या कार्यातून त्यांनी अनेक स्वयंसेवक कार्यकर्त्यांना दिशा व उर्जा दिली. रुग्णालयातील त्यांच्या वास्तव्याच्या काळात त्यांच्या शारीरिक तपासणीसाठी एक वेळा त्यांच्या खोलीत गेले असता काका काहीसे ग्लानीत वाटले. त्यांना जागे करण्यासाठी म्हणून मी आवाज देत त्यांना विचारले काका तूमचे बी.पी. तपासू? काकांनी मला म्हटले - ब्लड प्रेशर तपासणे हा तुमचा ऐच्छीक विषय आहे का? नंतर ते पूर्णपणे जागे झाले व त्यांनी एका गोष्टीच्या माध्यमातून मला जाणीव करुन दिली की तुम्ही तुमची कर्तव्यभावना स्वतःमध्ये अशा प्रकारे रुजवा की कितीही मायामोहाची वादळे आणि प्रतिकूल परिस्थितीचे डोंगर आडवे आले तरी ती कमी होता कामा नये. अत्यंत सहज व कमी काळ सहवास लाभलेल्यांवरही त्यांनी कर्तव्यनिष्ठतेबाबत असे सहज संस्कार केले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून स्व.श्री. सुरेशराव केतकर यांचे पूतणे श्री. शिरीशराव केतकर हे पुणे येथून प्रतिवर्षीप्रमाणे उपस्थित होते. त्यांनी आपल्या मनोगतामध्ये स्व. केतकर काका त्यांच्या रुग्णशय्येवर असताना देखील कशा प्रकारे 'संघपांथस्त' होते याविषयी आठवणी सांगितल्या.

कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक वक्ते म्हणून श्री. शेषाद्री डांगे, संघकार्यकर्ते धाराशिव यांचे मार्गदर्शन लाभले. ते म्हणाले 'स्व. सुरेशरावांचा व्यक्ती म्हणून कितीही व्याख्येत बसविण्याचा प्रयत्न केला तरीही ते शक्य नाही कारण ज्या दिवशी स्व. सुरेशराव प्रचारक म्हणून निघाले, त्याच वेळी त्यांनी आपले सर्वस्व राष्ट्रासाठी अर्पण केले. त्यांच्या दूरदृष्टीतून विवेकानंद रुग्णालयासारखे अनेक प्रकल्प आजही यशस्वी कार्यक्रमण करत आहेत.'

अशा व्यक्तीच्या नावाने आपणांस पुरस्कार मिळणे हे आपले भाग्य आहे. याहीपेक्षा गुणवंत होण्यासाठी व ती गुणवत्ता जपण्यासाठी आपली जबाबदारी आणखी वाढली आहे. रुग्णालयातील यापूढील दैनंदिन कामकाज हे सतत या पुरस्काराला स्मरून करावे लागणार आहे अशी जाणीव देखील त्यांनी गौरवमूर्तींना करुन दिली आहे.

पुरस्कार निवडीसाठी रुग्णालय कर्मचाऱ्यांचीच एक समिती स्थापन करण्यात आली, त्यामध्ये खालील निकषांवर गुणदान करुन गुणवंतांची निवड करण्यात आली. गौरवमूर्तींना गौरवपत्र, स्मृतीचिन्ह व रु. २१००/- चा



धनादेश देऊन गौरव करण्यात आला.

**निकष :** १) कामाबद्दलचे ज्ञान, २) कष्ट करण्याची तयारी व काम पूर्ण करण्याची सवय, ३) शिस्त, ४) अडचणी सोडविण्याची क्षमता व पध्दत, ५) रुग्ण व नातेवाईकांबरोबरची वागणूक ६) सहकारी व वरिष्ठांबरोबरची वागणूक, ७) वैयक्तिक तसेच सामाजिक जीवन, ८) रुग्णालयाच्या अन्य उपक्रमातील सहभाग, ९) रुग्णावरील निष्ठा

पुरस्कार वितरणाचे हे तिसरे वर्ष आणि या वर्षीचे पुरस्कार प्राप्त कर्मचारी -

१) श्री. मदन भोले, २) सौ. ज्योती बडे, ३) श्री. सुरेंद्र देशपांडे, ४) श्री. दत्ता बाकले, ५) सौ. वनिता सुर्यवंशी, ६) सौ. संतोषी बिडे, ७) श्री. अरुण कुलकर्णी, ८) श्री. महेश पंडगे, ९) श्री. महेश अंबुलगे

रुग्णालयाच्या सेवाभावास स्वतः आद्यकर्तव्य समजून प्रतिवर्ष सलग १५ वर्षे आषाढी एकादशीच्या वारीत वारकऱ्यांना आरोग्यसेवा देण्याचे पुण्यकर्म करणारे श्री सोमनाथ बालवड (मामा).

असा हा एकूण कर्तव्यभाव, सेवाभाव, ध्येयनिष्ठा इ. गुणांचे संक्रमण करणारा सोहळा व श्री. केतकर काकांच्या एकूण जीवनप्रवासाकडे पाहिल्यानंतर कवि बा.भ. बोरकरांच्या ओळी आठवतात -

*जळापरी मन निर्मळ ज्यांचे गेले तेथे मिळले हो!*
*मी पण ज्यांचे पक्व फळापरी सहजपणाने गळले हो!*
*जीवन त्यांना कळले हो, जीवन त्यांना कळले हो।*

**- डॉ.सौ. गौरी कुलकर्णी**

## अनुभव 'आत्मीय सेवेचा'

मा. डॉ. कुकडे काका, लातूर

स.न.वि.वि., मला लातूर येथील विवकानंद कॅन्सर हॉस्पिटलबद्दल थोडक्यात आलेल्या अनुभवाचे मनोगत व्यक्त करावेसे वाटते.

श्री बालाजीचे दर्शनाहून परत आल्यानंतर म्हणजे दि. १६/०२/१८ रोजी माझी पत्नी सौ. भारती ना. यादव यांना थोडासा त्रास सुरू झाल्याचे ज्ञात झाले, लागलीच सोनोग्राफी व वेगवेगळया चाचण्या केल्यानंतर गंभीर आजाराची पुसटशी कल्पना आली. पुढील उपचाराची योजना डॉ. झंवर यांच्या मार्गदर्शनाखाली विवेकानंद हॉस्पिटल लातूर मध्ये गर्भाशयाची शस्त्रक्रिया पार पडली. या दरम्यान मला डॉ. झंवर व डॉ. ढगे सहीत तेथील कर्मचाऱ्यानी, सेवाभावी वृत्तीने दक्षता घेऊन हा भयंकर रोग पूर्ण काढून टाकण्यासाठी अथक परिश्रम केले. त्याबद्दल किती धन्यवाद द्यावेत हे कळत नाही.

पुढील उपचार ठरले. रेडीयशन, केमोथेरपी वगैरेची व्यवस्था इथे नविन कॅन्सर हॉस्पिटल मध्ये झाली. जे पुण्या - मुंबईत होत होते ते लातूरला होत आहे याचे श्रेय डॉ. कुकडे काका यानाच द्यावेसे वाटते. या उपचारादरम्यान तेथील कर्मचारी व डॉक्टर संच यानी कसलीही कुचराई, दुर्लक्ष न करता आस्थेने, आदराने, सेवाभाव वृत्तीने मदत करीत आहेत हे प्रकर्षाने जाणवले. त्यात डॉक्टर काकांची वेळोवेळी होत असलेली भेट व वैयक्तिक लक्ष यातून त्यांच्या सामाजिक आत्मियतेचे दर्शन झाले हे आवर्जून नमूद करावे वाटते. गोरगरीब, मध्यमवर्गीय, श्रीमंत, प्रतिष्ठीत अशा सर्वच रुग्णांचे उपचार आस्थेने होत आहेत. आजही डॉक्टर काका जातीने सर्व सेवा सुविधावर लक्ष ठेवण्याचे काम अविरतपणे करीत आहेत याचे नवल वाटते. डॉ. प्रमोद टिके, डॉ.सौ. नेल्लोरे, डॉ.सौ. नागांवकर, श्री. रेवण चिंचोटे व रेडिएशन स्टाफ यांची सेवाभाव वृत्ती वाखणण्याजोगी आहे. हेच या विवेकानंद कॅन्सर हॉस्पिटलचे वैशिष्ट्य आहे. सेवा भावनेने कॅन्सर चे उच्चाटन, हे त्याचे ध्येयच आहे!

माझ्यासारखाच अनुभव सर्व रुग्णांना मिळत राहो ही परमेश्वराकडे माझी प्रार्थना!

**- नारायण यादव**
(सेवानिवृत्त प्राध्यापक)
१४७०, 'यदुनाथ', नारायण नगर, लातूर
मो.नं. ९४२१४४८७३१, ९८५०७९९०१२

## दिव्यत्वाची जेथ प्रचिती तेथे कर माझे जुळती

आपण ज्या व्यक्तीमत्वांच्या सान्निध्यात काम करतो त्यांच्या उदात्त कार्याने आपल्याही जीवनाला अर्थ प्राप्त होतो व त्यांच्या कृपाशिर्वादामुळे आपलेही जीवन प्रकाशमय होऊन जाते. अशा दोन व्यक्तीमत्वांच्या सहवासाचा लाभ मला झाला त्याचे हे अनुभवकथन...

सुमारे दीड वर्षापूर्वी माझ्या डाव्या हाताचे हाड अपघातामुळे क्षतीग्रस्त (फ्रॅक्चर) झाले होते. त्यावर Bone Grafting ही सर्जरी देखील यशस्वी झाली होती. मधला काळ सुखकर होता. परंतु ९ महिन्यानंतर अचानक हातामध्ये वेदना सुरू झाल्या. Wrist Belt चाही फारसा उपयोग होईना. शस्त्रक्रियासहाय्यक (OT Assistant) या पदावर कार्यरत असल्याने कामालाही न्याय देता येत नव्हता. तज्ञ



डॉक्टरांचा सल्ला घेतला असता पुन्हा ऑपरेशन करावे लागेल असा निर्णय घेण्यात आला.

मनात निराशेचे मळभ साचले. पुन्हा एका ऑपरेशनसाठी धीर होईना. सहाजिकच शल्यचिकित्सा विषयातील एक ध्रुवतारा असलेल्या आदरणीय पद्मभूषण डॉ. कुकडे काकांचे मार्गदर्शन घेतले. त्यांनी मला आधी आपल्या प्रेमळ परंतु खंबीर शब्दांनी आश्वस्त केले. अस्थिशल्यचिकित्सेमधील (Orthopedic Surgery) ऋषीतुल्य अशा पुण्याच्या डॉ. संचेती यांच्या हॉस्पिटलमध्ये पाठवले.

मी संचेती हॉस्पिटलला गेल्यानंतर डॉ. संचेती सरांची भेट घेतली. त्या वेळेत त्यांनी डॉ. कुकडे काकांचा संपर्क झाला असल्याची कल्पना दिली. त्यांनी माझ्या त्रासाविषयी व झालेल्या ऑपरेशविषयी आस्थेने चौकशी केली. तसेच ४ - ५ डॉक्टरांशी चर्चा करुन शेवटी डॉ. वारिद अल्ताफ सरांकडे Refer केले. दुसऱ्या दिवशी सकाळी ८ वा. ४० - ५० डॉक्टरांच्या Clinical Meeting मध्ये माझ्या CASF ची चर्चा झाली व सर्व मतानुसार (Left Proximal Row Corpectomy) चा ऑपरेशचा निर्णय पक्का झाला. त्यानुसार आॅपरेशनची तारीख ठरवुन लातूरला परत आलो. दि. १३ सप्टेंबरला ऑपरेशनसाठी दाखल झालो असता डॉ. संचेती सरांनी आस्थेने चौकशी केली तसेच Cash Counter वर कोणतीही Deposit भरुन घेऊ नका अशी प्रेमळ सूचनाही केली. डॉ. वारिद सरांनी देखील आधी भेट घेऊन ऑपरेशनविषयी सविस्तर माहिती दिली व सर्व शंकानिरसन करुन भिती दूर केली. २ ते २.५ तास ऑपरेशन चालले. ऑपरेशननंतर हॉस्पिटल स्टाफने उत्तम सेवा दिली. त्यामुळे हात अगदी तंदुरुस्त झाला व ४ दिवसानंतर Discharge देण्यात आला.

त्यानंतर मात्र अगदी अनपेक्षीत असा आश्चर्याचा सुखद धक्का डॉ. संचेती सरांनी दिला. त्यांनी परस्पर माझे सर्व Bill माफ केले होते. डॉ. कुकडे काकांच्या विवेकानंद रुग्णालयातून आला आहेत. मी तुझ्याकडून मोबदला घेऊ शकत नाही, असे नम्रपणे सांगितले. डॉ. कुकडे काका व डॉ. संचेती सर दोहोंबद्दलही अपार श्रध्दा तसेच डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले. मी या दोन्ही वैद्यवरांचा आयुष्यभर ऋणी राहीन. खरे पाहता मी रुग्णालयातील एक सामान्य कर्मचारी. पण मला पुण्यामध्ये VIP Treatment तसेच जागतिक दर्जाचा उपचार शक्य झाला ते आदरणीय कुकडे काकांच्या आशीर्वादामुळे. काकांच्या शब्दाचे महत्त्व मला तेव्हा कळले. या रुग्णालयात काम करण्याची संधी मला मिळाली हे माझे अहोभाग्य.

दिव्यत्वाची जेथ प्रचिती। तेथे कर माझे जुळती ।।

**- श्री. विष्णू नागनाथ पंडगे**
कर्मचारी, विवेकानंद रुग्णालय, लातूर

## डॉ. महेश देवधर - एक कर्मनिष्ठ व्यक्तिमत्व

मला दि. ०५ ऑक्टोबर २०१९ रोजी पुणे येथे डॉ. महेशराव देवधर यांच्या कौटुंबिक एकत्रीकरणाच्या कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी मिळाली. निमित्त होते : त्यांचा सत्तरावा वाढदिवस. या प्रसंगी त्यांच्या अगदी जवळचे नातेवाईकांसोबतच डॉ. कुकडे काका, डॉ.सौ. कुकडे काकू व डॉ.सौ. अनघाताई लवळेकर हेही उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरवातीस डॉ.श्री. व सौ. देवधर यांच्या जीवनातील महत्त्वाच्या टप्प्यांचे फोटो दाखवण्यात आहे. त्यात ते व डॉ.सौ. देवधर यांच्या कन्या वेदवती व तेजसी लहान असताना त्यांचेसोबत तसेच नातवंडांसोबतचे लहानपणीचे फोटो दाखवण्यात आले. विवेकानंद रुग्णालयात झालेले अनेक कार्यक्रम व त्यातील डॉ. देवधर यांचा सहभाग तसेच मातोश्री वृध्दाश्रम येथील विविध कार्यक्रमातील फोटो दाखवून त्यासंदर्भातील वर्णन व माहिती डॉ.सौ. वेदवती देवधर (खरे) व सौ. तेजसी देवधर (तनपुरे) यांनी दिली.

या कार्यक्रमात डॉ. देवधर यांच्या भगिनी श्रीमती मंगलाताई केळकर यांनी डॉ. देवधर यांच्या शालेय व महाविद्यालयीन आठवणींना उजाळा दिला. त्यात





लहाणपणापासून डॉ. देवधर हे अतिशय शिस्तप्रिय व काटेकोर होते याचाही आवर्जून उल्लेख केला. डॉ. देवधर हे सर्वच क्षेत्रात अग्रेसर होते. डॉ. देवधर यांची हिंदूत्वाप्रती असलेली प्रामाणिकता आणि सेवाकार्यातील सहभाग यांचाही उल्लेख केला.

डॉ. देवधर यांचे मोठे भाऊ श्री. मुकुंदराव देवधर यांनी डॉ. देवधर यांच्या जीवनातील अनेक प्रसंग सांगितले. या प्रसंगी डॉ. देवधरांचे विवेकानंद रुग्णालयाशी त्यांचे असलेल्या दृढ नात्याचा कुटुंबियांना प्रत्यय आला याचा त्यांनी अभिमानाने उल्लेख केला. डॉ. देवधर यांच्या वाटचालीत डॉ.सौ. अरुणा वहिनी यांचाही सातत्याने व मनःपूर्वक सहभाग मिळाल्याचे त्यांनी विशेषत्वाने नमूद केले.

डॉ. अनघाताई लवळेकर यांनी, त्यांचे डॉ. देवधर यांचेसोबतच्या वेगवेगळ्या टप्प्यावरील नातेसंबंध प्रसंग उलगडून दाखविले. अनघाताई यांनी, त्यांच्या हस्ताक्षरातील सुधारणा, भाषणशैली वृध्दिंगत होण्यासाठी तसेच वैचारिक जडणघडण होण्यास डॉ. देवधर यांची खुप मोठी मदत झाल्याचे सांगितले. डॉ. देवधर यांचा कमी बोलणे परंतु अधिक काम करणे, मार्मिक व मिश्किल बोलणे, अत्यंतिक कार्यमग्नता या विशेष पैलूंचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला. त्यांच्या व डॉ. देवधर यांच्या नात्यात ज्ञानप्रबोधिनी हा समान धागा असल्याचेही त्यांनी सांगितले.

डॉ. कुकडे काकांनी त्यांच्या व डॉ. देवधर यांच्या ४० वर्षाच्या सहवासाचा आढावा सांगितला. डॉ. कुकडे काकांनी त्यांच्या 'कामाप्रती असलेल्या कर्मनिष्ठेचा' विशेष उल्लेख केला. डॉ. देवधर यांनी सलग १४ वर्षे गंगापूर येथे जनरल ओ.पी.डी. चालविल्याचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला. चाळिस वर्षात डॉ. देवधर यांनी संस्थेच्या अनेक जबाबदाऱ्या संस्थापक सदस्य ते अध्यक्ष समर्थपणे सांभाळल्याचेही सांगितले. संस्थेच्या वर्धिष्णु प्रगतीत डॉ. देवधर यांचेसोबत डॉ. सौ. अरुणा यांचेही मोलाचे योगदान असल्याचे सांगितले. डॉ. देवधर यांचे लेखन कौशल्य व संस्थेबद्दलची टोकाची बांधीलकी याची त्यांनी प्रशंसा केली.

डॉ. देवधर यांनी त्यांच्या मनोगतात, माणूस, संस्कारामुळे कसा उत्तम घडू शकतो या संबंधी सांगितले. त्यांना उत्तम संस्कार देण्यात त्यांचे आई-वडिल, बंधु, मामा, गुरूजनांसोबतच ज्ञान प्रबोधिनीचे अप्पा पेंडसे व आण्णा ताम्हणकर यांचाही सहभाग असल्याचे त्यांनी सांगितले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संस्कारामुळे त्यांच्या व्यक्तिमत्वाचा पाया घडल्याचेही त्यांनी सांगितले. वागण्या-बोलण्यातील साधेपणा, नेमके व सत्य तेच बोलणे व पारदर्शी व्यवहार हे सर्व आपल्याला या संस्कारातून मिळाल्याचे त्यांनी नमूद केले.

विवेकानंद परिवारातर्फे डॉ. देवधर यांना मनःपूर्वक शुभेच्छा!

**- डॉ.रा.न. कुलकर्णी**
कार्यवाह

## अंदमान - सहल नव्हे... 'अभिवादन यात्रा'!

स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर यांनी स्वातंत्र्य प्राप्तिच्या लढ्यात इंग्रजांना जेरीस आणणाऱ्या केलेल्या कारवायांचा प्रतिशोध म्हणून इंग्रजांनी त्यांना दोन जन्मठेपेची म्हणजे ५० वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा दिली. प्रत्यक्षात त्यांनी १० वर्षे या सेल्यूलर जेलमध्ये शिक्षा भोगली. या जेलमधील त्यांच्या प्रखर देशभक्तियुक्त स्मृतींना अभिवादन करण्यासाठी ही यात्रा!

दि. १९ ला हैद्राबादहून विमानाने निघून दु. १२.३० वा. अंदमानची राजधानी पोर्टब्लेअर येथील वीर सावरकर विमान तळावर आम्ही उतरलो. त्याच दिवशी सायंकाळी सेल्यूलर जेलचा परिसर पाहिला, परिसराचे छान सुशोभीकरण करण्यात आले आहे. जेलच्या बाहेर सावरकरांच्या पुतळ्याशिवाय याच जेलमध्ये हुतात्मा झालेल्या ६ देशभक्तांचे पुतळे उभारण्यात आले आहेत.

दिवस मावळल्यानंतर आम्हाला जेलच्या आतमध्ये प्रवेश देण्यात आला, मनात अनेक भावना उचंबळून आल्या



होत्या. समोरच संतत तेवणाऱ्या क्रांती ज्योतीचे दर्शन घेतले आणि एका दुर्दैवी आणि मनस्वी चीड आणणाऱ्या घटनेची आठवण झाली. या ठिकाणी अत्यंत प्रेरणादायी अशा सावरकर रचित 'की घेतले व्रत न हे आम्ही अंधतेन' या काव्य पंक्ती लिहीलेला फलक लावलेला होता. काँग्रेसचे माजी मंत्री मणिशंकर अय्यर यांनी अत्यंत अपमाणित पध्दतीने तो काढून टाकला होता. त्या फलकाची नंतर वीर सावरकर विमानतळावर सावरकरांच्या अर्धपुतळ्याखाली पुनर्स्थापना करण्यात आल्याचे पाहण्यात आले.

त्यानंतर लाईट ॲण्ड साऊंड शो च्या माध्यमातून त्या जेलचा आणि त्यामध्ये सावरकर आणि इतर देशभक्तांना देण्यात आलेल्या क्रूर यातनांचा जळजळीत इतिहास सांगण्यात आला.

सावरकर ज्या खोलीत बंदिस्त होते त्या खोलीचे व संपूर्ण जेलचे विस्तृत दर्शन दुसरे दिवशी दुपारी घडविण्यात आले. मुळात सात शाखा असलेल्या जेल पैकी केवळ तीन शाखा शिल्लक ठेवल्या आहेत. या इमारती तीन मजली असून कैद्यांना परस्पर संपर्क होऊ शकणार नाही अशा पध्दतीने त्यांची रचना करण्यात आली आहे. कैद्यांना शिक्षा देण्याचे, कोलू फिरवून तेल काढण्याचे ठिकाण सर्व कैद्यांना दिसेल अशा ठिकाणी आहे.

सावरकरांची खोली तिसऱ्या मजल्यावर शेवटच्या टोकाला असून त्यांच्या खोलीपर्यंत कोणालाही पोहचता येणार नाही यासाठी एक अधिक सुरक्षा म्हणून लोखंडाची जाळी लावण्यात आली आहे. सावरकरांचे मनोबल खच्चीकरण व्हावे म्हणून त्यांना जी खोली देण्यात आली होती तिच्या गॅलरीमधून फाशीघर व प्रत्यक्ष फाशी देण्याची प्रक्रिया दिसत असे.

आमच्या गटाने सावरकरांच्या खोलीत बसून त्यांनी रचलेले 'जयोस्तुते श्री महन्मंगले' हे देशभक्तीने रसरसलेले गीत सामुहिकपणे म्हणण्याचे ठरवले होते. आश्चर्य म्हणजे आम्ही जेव्हा जेलच्या परिसरात पोहोचलो तेव्हा पर्यटक गटागटाने हेच गीत तन्मयतेने व उत्स्फुर्तपणे गात असल्याचा आवाज त्या खोलीच्या दिशेने येत होता.

आम्ही जेव्हा खोलीत पोहोचलो तेव्हा अंगावर रोमांच उभे राहिले. डोळे भरुन आले, कंठ दाटून आला, आम्ही तेथे ठेवलेल्या सावरकरांच्या फोटो समोर काही वेळ शांतपणे बसलो. 'जयोस्तुते' हे गीत सामुहिकपणे गायले. अत्यंत भारावलेल्या मनःस्थितीमध्ये बाहेर पडलो. खऱ्या अर्थाने येथेच आमच्या अभिवादन यात्रेची सांगता झाली.

पुढील ३ दिवसांमध्ये आम्ही रॉस आयर्लंड बेटावर गेलो, ते ब्रिटीशांच्या राजधानीचे ठिकाण होते. त्या बेटाचे आता नेताजी सुभाषचंद्र बोस असे नामकरण करण्यात आले आहे. दुसऱ्या महायुध्दाच्या दरम्यान त्यांनी या बेटावर येऊन ब्रिटीश सत्तेविरुध्द उठावाची योजना केली होती. येथेच आमची अनुराधा रॉय या देशभक्तीने रसरसलेल्या व्यक्तीमत्वाची भेट झाली. या बेटावरील घडामोडीचा अत्यंत अभ्यासपूर्ण इतिहास सांगताना आम्हा सर्वांना भारावून टाकले. तिचे वैशिष्ट्य म्हणजे, तिच्या भोवती सतत हरणांचा कळप, मोरांचा थवा, ससे व विविध पक्षी सहज वावरत होते व ती देईल त्या सूचनांचे ते पालनही करत होते.

अंदमानला जसा राजकीय इतिहास आहे तसाच सामाजिक आशयही आहे. संरक्षित अदिवासी समाजाचे चलन-वलन जवळून पहायला मिळाले. निसर्गाचे विलोभनिय दर्शनही झाले. स्पीड बोटीने मॅनग्रूव्ह सफारी, लाईमस्टोन केव्हज, मोठ्या जहाजाने समुद्र प्रवास, राधानगर बीचवरील सुंदर नितळ समुद्र, घनदाट जंगलातून वळणा-वळणांचा नयनरम्य प्रवास हा सर्व अनुभव मराठवाड्यासारख्या रुक्ष प्रदेशात राहणाऱ्या आम्हाला तरी आल्हाददायक व भारावून टाकणारा होता.

तथापि आमच्या या पूर्ण प्रवासावर सावरकरांनी व इतर देशभक्त बंदींनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी भोगलेल्या यातनांचे एक सावट होते त्यामुळे आमच्यासाठी तरी, ही सहल मनोरंजक किंवा उत्साहवर्धक न होता अंतर्मुख करणारी ठरली.

**- अनिल अंधोरीकर**
प्रशासनिक संचालक

**सर्वेपि सुखिनः सन्तु, सर्वे सन्तु निरामयाः।**
**सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःखमाप्नुयात् ।।**

प्रति,

प्रेषक :
**विवेकानंद रुग्णालय**
विद्यानगर, लातूर : ४१३ ५१२.
दूरभाष : (02382) 245901,2,3. फॅक्स : 02382-247901.
E-Mail : vhlatur@gmail.com
Visit us : www.vivekanand.org

CHITRA I 94210 95600